जा.क्रं. नावाशमनपा/नसका/सिआर-16/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक :- 25.11.2021

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
स्थायी समिती सभापती निवडणुकीसाठी विशेष सभेची सुचना

शासन अधिसुचना क्रं. विएनएम/5007/47/प्रक.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 मधील नियम 2(1) अन्वये व शासन अधिसुचना क्रं. विएनएम 2008/295/प्रक.106/2008/नवि-32 दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4 ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची नियडणुक घेणे ) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्रं. जा.क्रं. 2020/नपप्र/आस्था-1/कावि-966 दिनांक 24/11/2021 अन्वये निश्चित केल्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीसाठी स्थायी समितीची विशेष सभा दिनांक 02/12/2021 रोजी दुपारी 02.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृह क्र. 119 मध्ये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी मा. जिल्हाधिकारी, नांदेड ( पीठासीन अधिकारी ) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल.

सदर सभे मध्ये खालील प्रमाणे कामकाज होईल.

निवडणूक

विषय क्रं. 1:-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 21(1) व शासन अधिसुचना क्रं. विएनएम-5007/प्रक्र.15/नवि-32 दिनांक 17 फेब्रुवारी 2007 व शासन अधिसुचना क्रं. विएनएम/2008/295/प्र.क्र.106/2008/नवि-32/ दिनांक 12 डिसेंबर 2008 मधील नियम 4 ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समित्या आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणुक घेणे ) मधील तरतुदीनुसार स्थायी समितीच्या 16 सदस्यांमधून स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे बाबत.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
नांदेड वाघाळा शहर महागनरपालिका,नांदेड.

प्रति,
श्री / श्रीमती--------------------------------------------------
स्थायी समिती सदस्य / सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

निवडणूक कार्यक्रम पान नं. 2 वर पहा

Scanned with CamScanner

## निवडणूक कार्यक्रम

सभापती स्थायी समिती पदासाठी नामनिर्देशन पत्रे (नॉमिनेशन पेपर) वितरीत करणे व स्विकारणे इत्यादीचे कार्यक्रम पुढील प्रमाणे ठरविलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल / विवरण | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 01 | नामनिर्देशन पत्र वितरित करणे | दिनांक 30.11.2021 रोजी एकच दिवस सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यंत नामनिर्देशन पत्र वितरीत करण्यात येईल |
| 03 | नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची तारीख व वेळ | दिनांक 01.12.2021 रोजी एकच दिवस सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 वाजे पर्यंत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येईल. |
| 04 | नामनिर्देशन पत्रे कोणी व कोठे स्विकारावयाचे | नगरसचिव (नगरसचिव कार्यालय) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मुख्य प्रशासकिय इमारतीतील पहिला मजला रुम नं. 118 येथे नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येतील. |
| 05 | नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक 02.12.2021 रोजी विशेष सभा सुरु झाल्यानंतर सभागृहात मा. पीठासीन अधिकारी हे करतील. |
| 06 | उमेदवारी मागे घेणे | दिनांक 02.12.2021 रोजी सभागृहात छाननीनंतर वैध उमेदवाराची नावे मा. पिठासीन अधिकारी यांनी वाचुन दाखविल्यानंतर 15 मिनिटात लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांना देवुन उमेदवारी मागे घेता येईल. |

1) कोरे नामनिर्देशन पत्राचे नमुना (नॉमिनेशन पेपर, नगरसचिव मनपा यांच्या कार्यालयातून वर नमूद तारखेस व वेळत मिळतील )

2) उक्त पदासाठी निवडणुक लढविण्याची इच्छा असलेला कोणताही स्थायी समिती सदस्य या सोबत जोडलेल्या नमुना-1 मधील आपले नामनिर्देशन, पालिका सचिवाकडे नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करील.

3) प्रत्येक नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पूर्ण नांव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका स्थायी समिती सदस्यांने सुचक म्हणुन व दुस-याने स्थायी समिती सदस्याने अनुमोदक म्हणुन स्वाक्षरी केलेली असेल.

4) कोणताही स्थायी समिती सदस्य एका पेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सुचीत करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही. जर एखादा स्थायी समिती सदस्य प्रस्तावक म्हणून किंवा यथास्थिती अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करील तर नगरपालिका सचिवाला प्राप्त झालेले पहिले नामनिर्देशन पत्र वगळता इतर सर्व नामनिर्देशन पत्रे अवैध मानण्यात येतील व पिठासीन प्राधिका-याकडून ती नाकारली जातील.

परंतु असे की स्थायी समिती सभापती पदाच्या निवडी करिता सुचक किंवा अनुमोदक असणा-या स्थायी समिती सदस्यास त्या पदासाठी निवडणुक लढविता येणार नाही.

5) बोलाविण्यात आलेली स्थायी समितीची विशेष बैठक रद्द किंवा तहकुब करता येणार नाही .

6) उमेदवाराचे सुचक किंवा अनुमोदक यांना, उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणा-या कोणत्याही व्यक्तीस, ती नोटीस रद्द करण्याची परवानगी नसेल.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

Scanned with CamScanner